महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १६ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०८४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

**लक्षवेधी**



## जीवनदीप महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** भाषा हे संवादाचे अतिशय उत्कृष्ट माध्यम आहे या भाषेच्या माध्यमातूनच मानव आपल्या भाव भावना इतरांसमोर शब्दाच्या मार्फत व्यक्त करताना दिसत आहे. जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे दिनांक १५- ०९- २०२५ रोजी हिंदी दिवसाचे औचित्य साधत एक उत्कृष्ट कार्यक्रम राबवला. महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांच्या शुभहस्ते हिंदी दिवसानिमित्त लिहिलेल्या हिंदी कविता, पोस्टर, संतांचे चित्र हे सर्व महाविद्यालयाच्या सृजन भितीपत्रकावर लावण्यात आले होते; या भीती पत्रकाचे अनावरण सरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना हिंदी दिवस हिंदी भाषा याबाबत उत्तम मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ ,उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, यांनी देखील विद्यार्थ्यांना कविता सादर करत उत्तम मार्गदर्शन केले. हिंदी कविता वाचन, सादरीकरण तसेच प्रश्नमंजुषा अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सक्रिय सहभाग घेतला. हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. निहारिका देशमुख, प्रा.डॉ. मनीषा काकडे, प्रा. जया देशमुख, प्रा. फरिन सय्यद, प्रा. सतीश लकडे, प्रा. हनुमंत मेगंल, प्रा. मोहन गारे हे सर्व प्राध्यापक सदर कार्यक्रमास उपस्थित होते.

सदर कविता वाचन व सादरीकरण स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक. योग पाटील (TYBA), द्वितीय क्रमांक. तेजस्विनी थोरात(TYBAMMC ) तृतीय क्रमांक. दिया झाटे(TYBAMMC) पियुष कान्हेले (FYBA) या विद्यार्थ्यांनी उत्तर रीतीने कविता सादर करून पारितोषिक प्राप्त केले. ऋतुजा मस्कर, मनीषा शिसवे, ऋतुजा शिरोसे, रिया विश्वकर्मा , नंदिनी या विद्यार्थिनींनी सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. निहारिका देशमुख यांनी सर्वांचे आभार व्यक्त करत सदर कार्यक्रम संपन्न झाला असे जाहीर केले.

## ठाण्यात शुक्रवारी पाणीबाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. १५ :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रातील जलाशय येथे बारवी गुरुत्व वाहिनी क्र. १, २ व ३ वर वाहिन्यांचे उन्नतीकरण व तातडीने देखभाल करण्यासाठी शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे ठाणे पालिका क्षेत्रातील कळवा, मुंब्रा, दिवा यांच्यासह वागळे आणि माजिवडा-मानपाडा प्रभाग समितींचा काही भाग येथे शुक्रवारी (ता. १९) पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

# आदिवासी समाजाचा शहापूर ते मंत्रालय पायी मोर्चा

## बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात सामावेश करण्यास विरोध




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** बंजारा समाजाने त्यांना अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात सामाविष्ट करण्याची मागणी सुरु केल्याने आता आदिवासी समाजाने त्यास विरोध सुरु केला आहे. आदिवासी श्रमिक संघर्ष संघटना आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने ठाणे जिल्ह्यातील शहापूर ते मुंबईतील मंत्रालय असा पायी मोर्चा काढला होता. हा मोर्चा सोमवारी मुंबई नाशिक महामार्गान ठाण्यात दाखल झाला. यावेळी महामार्गावर मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी झाली होती. हैदराबाद गॅजेटिअरमध्ये बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सोमवारी बंजारा सामाजाने विविध ठिकाणी आंदोलन केले. तर आदिवासी सामाजाकडून आरक्षणाच्या मागणीस विरोध होत आहे. आदिवासी श्रमिक संघर्ष संघटना आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने शहापूर ते मंत्रालय असा पायी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला होता.

# अदानी समुहाच्या आंबिवलीतील सिमेंट फॅक्टरीला नागरीकांचा तीव्र विरोध

## स्थानिक भूमिपुत्रांच्या जमिनी-भातशेती धोक्यात?




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण नजीक मोहने आंबिवली परिसरात अदानी समूहाकडून उभारण्यात येणाऱ्या नियोजित सिमेंट फॅक्टरीला स्थानिक नागरिक ,सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, नगरसेवकांनी जोरदार विरोध केला असून या विनाशकारी फॅक्टरीमुळे स्थानिकांच्या जमीनी-भातशेती धोक्यात येणार असल्याने विरोध वाढत असून यावर उद्या सुनावणी घेण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.

प्रसिद्ध एनआरसी कारखान्याची ४६५एकर जमीन विकत घेतल्यानंतर त्या ठिकाणी सिमेंट फॅक्टरी उभारण्याचा अदानी समूहाचा मनोदय असून, अद्याप येथील कामगारांची थकीत देणी देण्यात आलेली नाहीत, हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे, असे असताना येथे सिमेंट फँक्टरीचा घाट घातला आहे.

या प्रकल्पामुळे प्रचंड प्रमाणात प्रदूषण होईल तसेच स्थानिक भूमिपुत्रांच्या जमिनी भातपीक बाधित होतील, असा गंभीर आरोप नागरिक व लोकप्रतिनिधींनी केला आहे.येथून जवळच असलेल्या मोहिली, गाळेगाव, मानिवली, संतेचापाडा, घोटस ई,पावशेपाडा, कांबा, रायते, आदी गावात हा धोका आहे.

या संदर्भात नालंदा बुद्ध विहार समितीच्या हॉलमध्ये माजी नगरसेवक महेंद्र गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करण्याकरिता सकल भारतीय समाज पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्याम गायकवाड तसेच आयटकचे जनरल सेक्रेटरी सुकुमार दामले उपस्थित होते. या बैठकीत मोहने परिसरातील सर्वपक्षीय नऊ नगरसेवकांनी एकत्र येत सिमेंट फॅक्टरीला तीव्र विरोध नोंदविला आहे. तर मोठ्या संख्येने स्थानिक नागरिकांनीही हजेरी लावून विरोधाची ताकद दाखवून दिली. यामध्ये माजी नगरसेवक दया शेट्टी, मयूर पाटील, दशरथ तरे, विजय काटकर, भिमराव डोळस, जनार्दन पाटील, माजी नगरसेविका सुनंदा कोट, संगीता गायकवाड आदी नगरसेवकांनी बैठकीमध्ये सहभाग घेऊन प्रकल्पाला जाहीर विरोध केला. या प्रकल्पामुळे हवा, पाणी, ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यामुळे याला विरोध वाढत आहे.यावर घेतलेल्या हरकती वर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ उद्या सुनावणी घेणार आह.

# बदलापूर-अंबरनाथ दरम्यान मालगाडीचे चाक घसरले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**मुंबई :** मध्य रेल्वेवरील बदलापूर-अंबरनाथ दरम्यान मालगाडीचे चाक घसरल्याने, लोकल सेवा ठप्प झाली आहे. ही घटना सोमवारी दुपारी १.३० च्या सुमारास घडली. या घटनेमुळे सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या लोकल सेवेवर परिणाम झाला आहे. तर, कल्याणवरून कर्जत-खोपोली दिशेने जाणारी लोकल सेवा कुर्मगतीने धावत आहे. रविवारी रात्रीपासून जोरदार पाऊस पडत असून, सोमवारी सकाळी पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे मुंबई शहर आणि उपनगरांतील अनेक सखल भागात पाणी साचले होते. याचा फटका लोकल सेवेला बसला.

डहाणू रोड, विरार, बोरिवलीवरून चर्चगेटच्या दिशेने आणि कर्जत, खोपोली, अंबरनाथ, बदलापूर, कसारा, आसनगाव, टिटवाळा, कल्याण, ठाणे, पनवेल, नेरुळ वाशीवरून सीएसएमटीच्या दिशेने येणाऱ्या लोकल सेवेवर परिणाम झाला. त्यात बदलापूर-अंबरनाथ दरम्यान मालगाडीचे चाक रेल्वे रुळावरून घसरल्यामुळे लोकल सेवा ठप्प झाली. सकाळपासून विलंबाने धावणाऱ्या लोकल, लांब पल्लाच्या रेल्वेगाड्या या चाक घसरण्याच्या दुर्घटनेमुळे पूर्णपणे बंद झाल्या.

# आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिरात अभिषेक आरती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मुरबाड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त मराडेपाडा भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तिपीठ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अभिषेक करून आरती करण्यात आली. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना " छत्रपती शिवाजी महाराजांच्या आशीर्वादाने आणि त्यांचा आदर्श अंगीकार करून, महाराष्ट्राची प्रगती आणि एकात्मतेसाठी माझा संघर्ष अजूनही अधिक उत्साहाने सुरू राहणार आहे. महाराष्ट्र अभिमानी जनता, विशेषतः युवक युवतींनी छत्रपती महाराजांच्या विचारांवर आधारित जीवन जगून आपला वारसा जपावा आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करावे ही माझी प्रामाणिक इच्छा आहे." असे आ. कथोरे म्हणाले सदर मंगलमय सोहळ्याला शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित लावून या ऐतिहासिक व धार्मिक सोहळयास मंगलमय साक्षीदार झाले. "जय जिजाऊ, जय शिवराय" च्या जयघोषात प्रसंगी उपस्थित सर्वांनी आनंदोत्सव साजरा करून आमदार किसन कथोरे यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

या सोहळयाचे उत्कृष्ट आयोजन करून भक्तांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी निष्ठा व श्रद्धा दृढ करण्याचे कार्य करणाऱ्या मंदिर समितीचे आमदारांनी आभार आणि कृतज्ञता व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान असून त्यांच्या प्रेरणेतूनच समाजहिताचे कार्य करण्याची ऊर्जा लाभते. अशा पवित्र कार्यात सहभागी होणे हे माझ्यासाठीही अभिमान आणि समाधानाची बाब आहे. या पवित्र सोहळ्याद्वारे महाराष्ट्राच्या इतिहासातील महान योद्धा आणि संग्राम नायक छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतींचा सन्मान आणि आशीर्वाद प्राप्त करण्याचा हा अद्वितीय क्षण होता.

● आमदार किसन कथोरे









# कुपोषणमुक्त ठाणे जिल्ह्यासाठी 'राष्ट्रीय पोषण माह'चे नियोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** केंद्र पुरस्कृत पोषण अभियान कार्यक्रमांतर्गत दरवर्षी सप्टेंबर महिन्यात 'राष्ट्रीय पोषण माह" साजरा केला जातो. यावर्षी १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आठवा राष्ट्रीय पोषण माह जिल्ह्यात उत्साहात राबविण्यात येणार आहे. यावर्षी लठ्ठपणा नियंत्रण, प्रारंभिक बालसंगोपन आणि शिक्षण, एक पेड मां के नाम, बालक व लहान मुलांच्या आहार पद्धती आणि वोकल फॉर लोकल या संकल्पनांवर आधारित पोषण अभियान पार पडणार आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा, प्रकल्प आणि अंगणवाडी स्तरावर विविध कार्यक्रम राबविले जातील.

स्थानिक आहाराला प्रोत्साहन देणे, तृणधान्ययुक्त आहाराचे महत्त्व सांगणे, पोषण वाटिकांना संजीवनी देणे, स्थानिक शेतकऱ्यांसोबत संवाद साधणे, स्थानिक महिला कलाकारांना व्यासपीठ देणे तसेच स्थानिक खाद्यपदार्थ व वस्तूंच्या वापरास चालना देणे असा वोकल फॉर लोकल या संकल्पनेचा उद्देश आहे. या अभियानाचा प्रमुख हेतू बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे हा असून बालकांच्या पहिल्या १००० दिवसांमध्ये योग्य पोषणाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्यात येणार आहे.

तसेच बालकांमधील लठ्ठपणा, प्रारंभिक शिक्षण आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीविषयी जनजागृती करणे हा देखील या मोहिमेचा भाग आहे. राष्ट्रीय पोषण माह २०२५ मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून कुपोषणमुक्त ठाणे जिल्हा घडविण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्यावतीने सर्व नागरिक, अंगणवाडी कार्यकर्त्या, शिक्षक, ग्रामसेवक आणि स्थानिक संस्थांना करण्यात येत आहे.

**"कुपोषणावर मात करणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. पोषण माहाच्या माध्यमातून आपण प्रत्येक कुटुंबापर्यंत योग्य आहार, योग्य जीवनशैली व योग्य माहिती पोहोचवून आरोग्यदायी समाजाची पायाभरणी करत आहोत. वोकल फॉर लोकल या संकल्पनेद्वारे आपण स्थानिक शेतकरी, स्थानिक आहार आणि स्थानिक परंपरा यांना बळकटी देऊन 'सशक्त भारत -पोषित भारत' घडवूया" - रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे.**

# ग्रामपंचायतींनी स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबवावे

## - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही "स्वच्छता ही सेवा" (SHS) अभियान राबविण्यात येणार आहे. दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हे अभियान जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. यावर्षीच्या या अभियानासाठी "स्वच्छोत्सव" ही थीम निश्चित करण्यात आली आहे.

या अभियानाचा शुभारंभ दिनांक १७ सप्टेंबर रोजी तालुका व गावस्तरावर परिसर स्वच्छता उपक्रमांद्वारे करण्यात येणार आहे. यामध्ये स्वच्छता लक्ष युनिट्स (CTUs) अंतर्गत अस्वच्छ ठिकाणांची निवड करून त्याठिकाणांची मॅपिंग व स्वच्छता केली जाणार आहे. तसेच, जास्त लोकसंख्या असलेल्या सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात येणार आहे. सफाईमित्र सुरक्षा शिबिरांद्वारे सफाई मित्रांसाठी 'एक खिडकी योजना' राबविण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर सफाई मित्रांच्या आरोग्य तपासणीसाठी विशेष आरोग्य शिबिरे आणि तालुकास्तरीय डिग्निटी कॅम्प आयोजित केले जाणार आहेत.

अभियानांतर्गत क्लीन ग्रीन उत्सव या उपक्रमाद्वारे पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव साजरा केला जाईल. तसेच प्रबोधनपर उपक्रमांमध्ये स्वच्छ सुजल गाव, कचऱ्यापासून कलाकृती, स्वच्छ स्ट्रीट फूड, प्लास्टिक संकलन केंद्र उभारणी यांसारख्या जनजागृतीपर कार्यक्रमांचा समावेश असेल. याशिवाय "एक दिवस, एक तास, एक साथ" या महास्वच्छता उपक्रमांतर्गत दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी देशव्यापी श्रमदान होणार असून, सर्व गावस्तरीय घटकांचा यात सहभाग असेल.

विशेष ग्रामसभेद्वारे गावांना हागणदारी मुक्त अधिक मॉडेल गाव, स्वच्छ सुजल गाव व हर घर जल या उपक्रमांतर्गत घोषीत करण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. ही विशेष ग्रामसभा दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत कधीही आयोजित करता येईल.

स्वच्छता ही सेवा २०२५ या अभियानातील सर्व उपक्रम केंद्र शासनाच्या विशेष तयार केलेल्या IT पोर्टलवर www.swachhatahiseva.gov.in वर नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व उपक्रमांचे सतत निरीक्षण शासनस्तरावरून केले जाणार आहे.

"ग्रामपंचायतींनी उत्साहाने व प्रभावीपणे या अभियानात सहभाग नोंदवावा आणि जिल्हा स्वच्छतेच्या दिशेने एक आदर्श घालून द्यावा," असे आवाहन पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक पंडीत राठोड यांनी केले आहे.

# भिवंडीत सत्ता आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करावे

## - राजेश शर्मा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : आगामी होणाऱ्या भिवंडी महानगर पालिकेत काँग्रेस पक्षाची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्तेनी कामाला सुरुवात करावी. आपसातील मतभेद विसरून एक दिलाने काम करावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते व भिवंडी चे नवनियुक्त प्रभारी निरीक्षक राजेश शर्मा यांनी केले.

काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्षांनी भिवंडी काँग्रेस पक्षाचे प्रभारी म्हणून राजेश शर्मा यांची नियुक्ती केली असुन आज सायंकाळी 5 वा.ते भिवंडी काँग्रेस पक्ष कार्यालयात निवडणूक कामाचा आढावा घेण्यासाठी आले होते यावेळी पक्षाचे माजी आमदार व शहर जिल्हाध्यक्ष रशिद ताहीर मोमीन यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी माजी खासदार सुरेश टावरे, प्रदेश उपाध्यक्ष राणी अग्रवाल,तारीक फारुकी,डॉ.नुर अन्सारी,आरशी आझमी,आबिद मनसब,अमरीश भोई,महिला अध्यक्ष रूखसाना कुरेशी,सलाम शेख,लतीफ बाबा,रेहान अंसारी,सुरेश मस्के अदि पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेऊन पक्ष बांधणी करून कामाला सुरुवात करावी येत्या महापालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सत्ता आणण्यासाठी जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणूनआपला महापौर कसा बसेल यासाठी विशेष प्रयत्न करावे असे आवाहन राजेश शर्मा यांनी केले. यावेळी कार्यक्रम संचलन आरशी आझमी यांनी केले.

# नवरात्रीपूर्वी खड्डे भरा | शिंदे गटाचा केडीएमसीला इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : कल्याण शहरातील ऐतिहासिक आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदपस्पर्शाने पावन झालेल्या किल्ले दुर्गाडी येथे गेली पन्नास वर्षोपासून किल्ले दुर्गाडी उत्सव समिती आणि शिवसेनेच्या माध्यमातून नवरात्र उत्सव साजारा केला जातो. पाच लाखहून अधिक भक्तगण यानिमित्ताने दर्शनचा लाभ घेतात. या उत्सवानिमित्त व्यसनाधितेकडे जाणाऱ्या तरूणाईला परावृत्त करण्यासाठी संदेश देण्याचे काम केले जात असल्याची माहिती किल्ले दुर्गाडी येथे शिवसेना कल्याण शहर प्रमुख रवि पाटील यांनी दिली. नवरात्र उत्सवाच्या तयारीचा आढावा पाटील यांनी घेतला यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.

तर कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात खड्डयांमुळे रस्त्यांची अक्षरश चाळण झाली आहे. गणेशोत्सवा दरम्यान देखील रस्त्यावरील खड्डे व्यवस्थित बुजवले गेले नाहीत. आता नवरात्र उत्सव सुरू होणार आहे. नवरात्र उत्सव सुरू होण्याआधी रस्त्यावरील खड्डे बुजवले पाहिजेत, नाहीतर आम्ही अधिकाऱ्यांना त्या खड्डयात टाकू असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे कल्याण शहर प्रमुख रवी पाटील यांनी केडीएमसी अधिकाऱ्यांना दिला आहे. या प्रसंगी शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक सुनील वायले, गणेश जाधव, सुनील खारूक, प्रतिक पेणकर, शिवसेना शहर संघटक नेत्रा उगले यासंह महिला वर्ग उपस्थित होता.

# पेणमध्ये नव भारत साक्षरता अभियान

## २१ सप्टेंबरला नवसाक्षरांची परीक्षा






दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : केंद्र शासन पुरस्कृत नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत राज्य शासनामार्फत संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून पेण तालूक्यात गट शिक्षणाधिकारी श्रीमती. शर्मिला शेंडे यांच्या मादर्शनाखाली उत्तम पध्दतीने सूरु आहे.

पेण तालूक्यात ९९९ एवढ्या निरक्षरांची नोद झाली असून तांत्रिक कारणास्तव ३०५ असाक्षरांची ऑफलाईन नोंद झाली. या विषया संदर्भात राज्य स्तरीय, जिल्हास्तर, तालुकास्तर केंद्रस्तर व शाळास्तर या पद्धतीने शिक्षक स्वयंसवेक यांचे प्रतिक्षिण शाळा स्तरावर झाले आहे. प्रत्येकी १० असाक्षरांसाठी १ स्वयंसेवक काम करत आहेत. सदर असाक्षरांसाठी २१सप्टेंबर२०२५ रोजी शासनामार्फत लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परीक्षा त्या-त्या शाळेवर घेण्यात येणार असून परीक्षेसाठी शाळा हेच केंद्र असणार आहे शासनामार्फत प्रश्नपत्रिका पुरविण्यात येणार आहेत.

नियामक परिषद रचना समितीचे अध्यक्ष तहसीलदार साहेब व कार्यकारी समितीचे अध्यक्ष गट विकास अधिकारी हे आहेत.सदरचे अभियान पेण तालुक्यात नोडल अधिकारी म्हणून गट शिक्षणाधिकारी श्रीमती शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती करुणा भोईर यांनी सांख्यिकीय माहिती अद्यावत केली आहे.रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी (योजना) यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अभियान सुरू आहे. राज्यस्तरीय प्रशिक्षण पेण साधन व्यक्ति करूणा भोईर,जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी राकेश अहिरे यांनी काम पाहिले, तर तालुका स्तरावर मदन मुगळे कृष्णकांत सावंत फरीद शिरगावकर भगत सर यांनी सुलभकाची भूमिका पार पाडली. केंद्रस्तर व शाळा स्तरावर सर्व केंद्रप्रमुख आणि शिक्षकांनी सुलभकाची उत्तम कामगिरी पार पाडली. सर्व तालुक्यातील शाळांमध्ये स्वयंसेवक प्रशिक्षण देत आहेत अशी माहिती पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती शर्मिला शेंडे यांनी दिली.

# शिक्षकांचा गुणवंत पुरस्काराने गौरव

## लक्ष्मणराव चतुर यांना जीवनगौरव पुरस्कार



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडी, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षिका संघ, पुणे जिल्हा उच्च माध्यमिक शिक्षक संघ आणि पुणे जिल्हा सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार समारंभ रविवारी (१४ सप्टेंबर) तुलसी पॅलेस मंगल कार्यालय आळेफाटा येथे उत्साहात पार पडला. या समारंभात जिल्ह्यातील ६५ गुणवंत शिक्षकांचा सन्मान करण्यात आला असे पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष पंकज घोलप यांनी सांगितले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे अध्यक्ष के. एस. ढोमसे हे होते.

या वेळी पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष लक्ष्मणराव चतुर यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद पुणे (माध्यमिक) शिक्षण विभाग वेतन पथकाचे अधीक्षक दत्ता कठाळे आणि विस्तार अधिकारी (शिक्षण) निलेश धानापुने यांचा विशेष सन्मान करण्यात आला. पुरस्कार वितरण महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष जी. के. थोरात, के. एस. ढोमसे, पंकज घोलप, सोमनाथ भंडारे, स्नेहल बाळसराफ, हनुमंत चव्हाण आणि इतर मान्यवरांच्या हस्ते झाले. प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि अल्पोपहारासाठी अमोल वंडेकर, डॉ. हनुमंत भोसले आणि अनिल गडगे यांनी आर्थिक सहकार्य केले.

कार्यक्रमाचे संयोजन जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षक संघ, तालुका शिक्षक लोकशाही आघाडी, माध्यमिक शिक्षिका संघ आणि सेवानिवृत्त शिक्षक संघ यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी के.एस.ढोमसे,पंकज घोलप, प्रदीप गाढवे , विजय घोलप, संतोष सहाणे, संदीप दातीर, सविता ताजणे, संतोष कांबळे ,प्रशांत घुले, अर्चना भारती, तानाजी वामन, ज्ञानेश्वर केंद्रे, राजेंद्र सुतार, रमेश ढोमसे हनीफ शेख, रवींद्र डुंबरे,हिरामण शिंगोटे,रामदास डुंबरे, जगन्नाथ गाढवे, किशोर पगार, रमेश मालुंजकर, प्रकाश जोंधळे, प्रमोद जाधव, संतोष देवकुळे, प्रमोद मुळे, मंगेश डुंबरे, धीरज सोनवणे, प्रदीप सूर्यवंशी, सुनील पोकळे, तुषार आहेर, बाळकृष्ण लोहकरे, योगेश गाढवे, कैलास दाभाडे, विश्वास भालिंगे, चंद्रकांत दुरगुडे, अरुण मातेले,किरण औटी ,सरिता आबक, उषा सावंत, सरिता कलढोणे ,वनिता निलख, सुवर्णा नांगरे,जयश्री कदम, जयश्री चौधरी,शोभा तांबे, कमल शिरोळे, रूपाली आवारी,आसावरी गायकर, उषा भारती, राजश्री लोहोटे, संगीता गाडेकर, सारिका नलावडे, सुषमा बनकर ,साधना जुन्नरकर ,सुनिता फापाळे, वनिता भोर, सोनाली कांबळे, राजश्री भालेकर, निर्मला भोर यांनी मोलाचे सहकार्य केले.

यावेळी वल्लभ शेळके, यादव चासकर, तानाजी झेंडे, ज्योती दहितुले, सुनील राजे निंबाळकर, विजय घोलप, प्रदीप गाढवे, शिवाजी कामथे, संतोष थोरात, स्वाती उपार,राज मुजावर, शशिकांत शिंदे,धोंडीबा कुमकर, वसंतराव ताकवले, राजेंद्र पडवळ, अशोक देवकर, रामप्रभू पेटकर, अशोक दरेकर, किशोर दरेकर, सुनील ताकवणे, अंकुश कुडपणे आणि तालुक्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष पंकज घोलप यांनी केले, तर सूत्रसंचलन भाऊसाहेब खाडे व मुरलीधर मांजरे यांनी केले. आभार शोभा तांबे यांनी मानले.

# 'आपले सरकार पोर्टल'वरील २ हजाराहून अधिक तक्रारी निकाली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्य सरकारने सुरु केलेल्या आपले सरकार २.० वरील तक्रारी निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे सामान्य प्रशासन विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात आली आहे. जिल्हा परिषदेस आपले सरकार पोर्टलवर २ हजार ७६२ तक्रारी प्राप्त झाल्या असून २ हजार ६६५ तक्रारी निकाली काढल्या आहे तर फक्त ९९ तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय स्तरावर विस्तृत अहवाल मागणीसाठी प्रलंबित आहेत. या पोर्टलद्वारे ग्रामस्थांना आपल्या तक्रारी ऑनलाइन दाखल करणे तसेच त्याची सद्यस्थिती जाणून घेण्याची सुविधा उपलब्ध असून ९७ टक्के तक्रारी निकाली काढण्यात यश मिळवले आहे.

शासन निर्देशानुसार २१ दिवसांच्या आत तक्रारीचे निराकरण करणे अनिवार्य असून मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषदेकडे येणाऱ्या तक्रारी सरासरी ११ दिवसांच्या आतच निकाली काढण्यात येत असून सर्व विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी यासाठी विषेश प्रयत्न केले आहेत.

आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक सोमवारी साप्ताहिक सखोल आढावा घेण्यात येतो. तक्रारदाराची तक्रार मांडणी व्यवस्थित न झाल्यास किंवा म्हणणे न समजल्यास तक्रारदारास दूरध्वनीवर तात्काळ संपर्क केला जातो. तक्रारींचे निवारण ठाणे जिल्हा परिषदेकडून उत्तमप्रकारे होत असल्याबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), अविनाश फडतरे यांनी दिली.


राज्य शासनाच्या १५० दिवस कार्यक्रम या अभियान अंतर्गत आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी निकाली काढण्यासाठी देखील विषेश भर देण्यात येत आहे.

# कल्याणच्या पटेल मार्टमध्ये मराठी बोलण्यावरुन वाद

## मराठी बोलायची सक्ती आहे का महिला कर्मचाऱ्याची सामाजिक कार्यकर्त्याला आरेरावी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील पटेल आर मार्ट मध्ये खरेदीसाठी आलेल्या ग्राहकाने तेथील महिला कर्मचारीकडे एका वस्तु संदर्भात विचारणा केली असता या तरुणीने हिंदूतून उत्तर दिले. याबाबत ग्राहकाने 'तुम्हाला मराठी बोलता येत नाही का?' असा सवाल केला असता या तरुणीने 'मराठी बोलता आले नाही तर काय फरक पडतो?' असे उत्तर ग्राहक सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांना दिले. यानंतर घाणेकर यांनी थेट तेथील व्यवस्थापकांकडे सदर तरुणीची तक्रार



केल्यानंतर व्यावस्थपकांनी याबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे.

अमराठी तरुणीकडून मराठीचा अपमान झाल्याबद्दल ग्राहक घाणेकरांच्या तक्रारीनंतर पटेल आर मार्टच्या व्यवस्थापक मोनिका धस

### १५ ऑक्टोबर पर्यंत मराठी न आल्यास दुकानातून खरेदी न करण्याचे करणार आवाहन

यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना ग्राहकांशी मराठीत बोलण्याच्या सूचना दिल्या आहेत. एका महिन्याच्या आत येथील कर्मचाऱ्यांनी जर मराठी शिकली नाही तर पुढील महिन्यात यांच्या दुकानाबाहेर उभा राहून येथून खरेदी करू नका, यांना मराठी येत नाही असे आवाहन येथे येणाऱ्या प्रत्येक ग्राहकांना करीन, असा ईशारा घाणेकर यांनी पटेल आर मार्टच्या व्यवस्थापकांना दिला आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




**मेष**
ऑफिसमध्ये कामाचा ताण जास्त असू शकतो. कौटुंबिक जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडाल. गुंतवणूक भविष्यासाठी फायदेशीर ठरेल.

**वृषभ**
काही जुन्या जमिनीतून आर्थिक फायदा होईल. काम स्वतः पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. इतरांकडून अपेक्षा ठेवल्याने कार्यक्षमता कमी होईल.

**मिथुन**
आम्ही ही कमतरता दूर करू आणि आमच्या कामासाठी समर्पित राहू. इतरांच्या सल्ल्यावर अवलंबून न राहता, स्वतःहून निर्णय घ्या.

**कर्क**
समाजात तुमचा आदर आणि वर्चस्व कायम राहील. तुम्ही कोणतेही काम पूर्ण करू शकाल. आज तुम्हाला नवीन संधी मिळू शकते.

**सिंह**
मालमत्तेच्या खरेदी-विक्रीशी संबंधित काम करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.तुम्हाला अधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**कन्या**
मेहनत आणि चांगली जीवनशैली सकारात्मक परिणाम देईल. मुलाच्या करिअरशी संबंधित कोणत्याही चिंतेवर उपाय मिळाल्याने आराम मिळेल.

**तूळ**
अधिकृत प्रवास तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. सामाजिक संपर्कातून काही नवीन माहिती मिळेल, जी तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**वृश्चिक**
कामे लवकर पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम कराल, यशस्वी देखील व्हाल. काळ तुमच्यासाठी मोठी उपलब्धी निर्माण करत आहे.

**धनु**
मित्रांना भेटण्याची संधी मिळेल आणि मनोरंजनाने भरलेले वातावरण असेल. व्यस्त असूनही तुम्ही तुमची वैयक्तिक कामे सहजपणे पूर्ण करू शकाल.

**मकर**
वैयक्तिक कामावरही लक्ष केंद्रित करू शकाल. घरामध्ये काही नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. काम पुढे ढकलणे योग्य नाही.

**कुंभ**
आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या तुमच्या प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात यश मिळेल.आत्मविश्वास आणि मेहनत तुम्हाला तुमच्या कामात यश देईल.

**मीन**
चांगली बातमी मिळाल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.दिवस यशाचा काळ असेल. नियोजन करून दैनंदिन दिनचर्या व्यवस्थित कराल

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानासाठी मुरबाड येथे विशेष सभा

## आमदार किसन कथोरेंची प्रमुख उपस्थिती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /मुरबाड : राज्यातील ग्रामविकास विभागाच्या वतीने ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरु करण्यात आले आहे.या अभियानाच्या माध्यमातून गावागावात विकासाची स्पर्धा निर्माण होऊन लोकचळवळीला नवसंजीवनी मिळणार आहे. मुरबाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता गायकवाड यांच्या पुढाकाराने तालुका स्तरीय कार्यशाळा नुकतीच मुरबाड येथे आयोजित करण्यात आली होती.भारत हा कृषी प्रधान देश असून गाव हे त्याचे केंद्र बिंदू आहे. गावांचा शाश्वत विकास साधल्या शिवाय देशाचा विकास अशक्य आहे. त्यामुळे या अभियानातून राज्यात मोठी लोकचळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, रस्ते,आदी मुलभ सुविधावर भर असणार आहे. त्याच बरोबर ग्रामविकास मंत्र्याच्या मार्गदर्शनाखाली ठिबक सिंचन, शेततळे,बंधारे,जलसंधारण, जलयुक्त शिवार यासारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. सेंद्रिय शेतिला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, महिला बचत गटाच्या माध्यमातून सक्षम करणे,तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन,मत्स व कुकुट पालन यांना चालना दिली जाणार आहे.

राज्य सरकारने त्यासाठी ग्रामपंचायतींना प्रोत्साहन म्हणून राज्यस्तरीय, विभागस्तर,जिल्हा स्तर,तालुकास्तर व विशेष पुरस्कार देण्यात येणार आहेत. प्रत्येक तालुक्यातील दोन ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच लाख रूपये बक्षीस देण्यात येणार आहे. बुधवार दिनांक 17/09/2025 रोजी तालुक्यातील झाडघर येथे विशेष सभेचे आयोजन करण्यात आले असून आमदार किसन कथोरे या सभेला विशेष मार्गदर्शन करणार आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानासाठी आमची तयारी सुरु आहे. 17 सप्टेंबर ते 31 डिसेंबर 2025 असा कालावधी असणार आहे. मुरबाड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी स्पर्धेत भाग घ्यावा तशा प्रकारचे नियोजन चालू आहे. त्यासाठी जनजागृती सुरु केली आहे.गावा गावात ही चळवळ रूजवून अधिकाधीक ग्रामपंचायतींनी सहभाग घ्यावा यासाठी आम्ही प्रयत्न शिल आहोत
- डॉ.लता गायकवाड,
गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरबाड

# विद्यार्थ्यांकडून ITMC प्रणालीची व वाहतूक नियमांची जनजागृती

## ‘आयटीएमएस’ प्रणालीचा ठाण्यात शुभारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नागरिकांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन न करता नियमाचे पालन करण्यास प्रवृत्त करणे, अपघातांचे प्रमाण कमी करणे व सुरक्षित वाहतूक करण्यासाठी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर वचक बसावा यासाठी वाहतुक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाठ यांचे मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रण विभाग व संकल्प इंग्लिश विद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 12 सप्टेंबर 2025 रोजी कॅडबरी सिग्नल, ठाणे येथे संकल्प विद्यालयातील आर.एस.पी.चे विद्यार्थ्यांनी ITMC (इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम) प्रणाली व वाहतूक नियमांविषयी जनजागृती करून ITMS या आत्याधुनिक प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला.

या प्रणाली अंतर्गत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना त्यांच्या मोबाईलवर त्वरित दंड पाठवला जातो. त्यांनी नियमांचे उल्लंघन करू नये व त्यांना दंड बसू नये म्हणून सदर यंत्रणेचा प्रसार होणे आवश्यक होते. म्हणून आर एस पी चे विद्यार्थ्यांनी विविध विद्यार्थ्यांनी पोस्टर, घोषवाक्य,



प्रात्यक्षिके सादरीकरणे करून “हेल्मेट वापरा – आयुष्य वाचवा”, “सिग्नलचे पालन करा – सुरक्षितता राखा” अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला. ITMC प्रणाली कशी कार्य करते, रस्त्यावरील सिग्नल, कॅमेरे आणि वेगमर्यादेवर लक्ष ठेवून वाहतूक शिस्त कशी राखते, याबाबत विद्यार्थ्यांनी सोप्या भाषेत माहिती दिली.

यावेळी वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाठ, वाहतुक विभागाचे कोकणी, बोराले, ठाणे जिल्हा आरएसपी प्रमुख सल्लागार माणिक पाटील, डॉ. राज परब, बाळा साठे, दिपाली साठे व संकल्प इंग्लिश विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पक उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की वाहतूक नियम पाळणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यासाठी ठाण्यातील जास्तीत जास्त सिग्नलवरती आयटीएमएस प्रणाली सुरू करू असे आश्वासन दिले.

# आमदार किसन कथोरेंच्या वाढदिवसानिमित्त घोटसई ग्रामपंचायत तर्फे विविध उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित ग्रामपंचायत कार्यकारिणी घोटसई यांनी *300 विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटप तसेच 60 अपंग व्यक्तींना अन्नधान्य वाटप. व अंगणवाडी मधील लहान मुलांना शालेय गणवेश वाटप असे विविध लोकोपयोगी कार्यक्रम आयोजित केले होते..या कार्यक्रमा दरम्यान गणपती साना मध्ये पर्यावरण समतोल देखावा स्पर्धेत उत्तीर्ण झालेल्या स्पर्धकांना पारितोषिक वितरित करण्यात आले

या कार्यक्रमाचे ठिकाण जिल्हा परिषद शाळा घोटसई होते तर कार्यक्रमासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री रवींद्र घोडविंदे *उद्योजक दिनेश कथोरे , बाजार समिती



संचालक योगेश मगर,, तंटामुक्ती अध्यक्ष. काशीनाथ मगर, सरपंच - दया मगर उपसरपंच रोशनी धुमाळ माजी सरपंच सुयोग मगर व सर्व आजी माजी सदस्य सरपंच व भारतीय जनता पार्टी चे कार्यकर्ते उपस्थित होते.. या कार्यक्रमात समापन करताना जेवढे मोठे कथोरे साहेबाचे विकास कार्य आहे. तेवढीच लोकसेवा साहेबांच्या वाढदिवसानिमित्त साहेबांच्या सर्व कार्यकर्त्यांकडून व भारतीय जनता पार्टी या पदाधिकारी यांच्याकडून पूर्ण मतदार संघामध्ये येत्या 7 दिवसात होईल असा विश्वास घोटसई गावाचे माजी सरपंच सुयोग मगर यांनी व्यक्त केला.

# ठाणे जिल्ह्यात ‘Door Step Delivery’ उपक्रमांतर्गत नागरिकांना घरपोच शासकीय सेवा

## – मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

### ८० विभागांच्या तब्बल ४०२ सेवा आता नागरिकांच्या दारी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता


ठाणे : सामान्य नागरिकांना सरकारी सेवा त्यांच्या दारातच सहज, सुलभ आणि जलदगतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 'Door Step Delivery' या अभिनव उपक्रमामुळे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांना घरबसल्या शासनाच्या विविध सेवा मिळत आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम लोकाभिमुख व परिणामकारक ठरत आहे.

सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या दारी सेवा उपलब्ध करून देणे, हेच खऱ्या अर्थाने सुशासनाचे प्रतीक आहे. 'Door Step Delivery' उपक्रमाद्वारे आम्ही प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करत आहोत. हा उपक्रम प्रत्येक गावात, प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी घरपोच जलद व सुलभ प्रशासकिय दाखले घेण्यासाठी ‘Door Step Delivery’ प्रणालीमार्फत सेवा घ्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

या प्रणालीद्वारे नागरिकांना घरबसल्या ४०२ प्रकारच्या शासकीय सेवा मिळू शकतात. प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ४ हजार १३ अर्ज आल्या असून, ३ हजार ६५९ नागरिकांना घरपोच सेवा देण्यात आली आहे. उर्वरित १७० अपॉईंटमेंटवर काम सुरू असल्याबाबतची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी दिली.

**या उपक्रमामार्फत मिळणाऱ्या प्रमुख सेवा व विभाग:**

मृत्यू दाखला, जन्म



दाखला, दारिद्र्यरेषेखालील दाखला, ग्रामपंचायतीचा येणे बाकी नसल्याचा दाखला, विवाह नोंदणी दाखला, नमुना नं ८ चा दाखला (मालमत्ता फेरफार), निराधार योजनेसाठी वयाचा दाखला हे सर्व लोकहक्क सेवा आयोगांतर्गत येणारे हे सात दाखले 'Door Step Delivery' मार्फत देण्यात येत असून त्या व्यतिरिक्त इतर विभागाचे जसे जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, उद्योग आधार, जीवन प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती अर्ज, पॅनकार्ड व दुरुस्ती, पासपोर्टसाठी शपथपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, शेत मोजणी अर्ज, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, राजपत्र प्रकाशन, १५ वर्षाचे रहवासी प्रमाणपत्र, खाद्य परवाना जीवन प्रमाणपत्र, हयात प्रमाणपत्र, आभाकार्ड (आयुष्मान भारत आरोग्य खाते), शेत मोजणी अर्ज / Farm Measurement Application, डिश टीव्ही डिटीएच रीचार्ज, शिष्यवृत्ती अर्ज (Scholarship Application), केंद्र सरकार ओबीसी प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, GST Form, Hotel Licence, टीकीट आरक्षण, निवासी शाळा, परदेशी शिष्यवृति, शासकीय वसतिगृह प्रवेश, अर्थ कुटुंब सहाय्य, नविन कौटुंबिक शिधापत्रिका, महाभरती, नोकरीसाठी नोंदणी (रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय), भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्रासाठी अर्ज अशा ४०२ सेवा तर महसूल विभाग, पोलीस/गृह विभाग, भूमि अभिलेख विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण, डिजिटल जीवन प्रमाण, आयकर विभाग, पासपोर्ट-परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, आरोग्य विभाग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय, जिल्हा परिषद अशा प्रशासकिय ८० विभागातील ‘Door Step Delivery’ या प्रणालीद्वारे घरपोच सेवा मिळू शकतात. ग्रामपंचायतींच्या कार्यरत केंद्रचालक यांना ही जबाबदारी दिली असून यासाठी आपले सरकार सेवा केंद्र मधील केंद्रचालक यांच्यामार्फत कार्यान्वित आहेत. केंद्रचालक नागरिकांकडून वेळ ठरवून त्यांच्या घरी येतात, आवश्यक कागदपत्र स्कॅन करतात आणि ऑनलाइन सेवा प्रक्रिया पूर्ण करतात. सेवा मंजूर झाल्यावर संबंधित प्रमाणपत्र पुन्हा घरपोच पोचवले जाते.

**अपॉईंटमेंट व मदतीसाठी तसेच अधिक माहितीसाठी:**

नागरिकांनी https://thanedoorstep.in/ या संकेतस्थळावरून अपॉईंटमेंट घ्यावी किंवा मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक ८३८०८२२३३३ वर संपर्क साधावा. “नागरिकांनी आपल्या सोयीसाठी या अभिनव उपक्रमाचा लाभ घ्यावा, घरच्या घरी प्रमाणपत्रे व शासकीय सेवा मिळवून वेळ आणि खर्चाची बचत करावी,” असे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

# ईगल फाऊंडेशनच्या वतीने राष्ट्रीय गरुडझेप २०२५ साठी पुरस्कारांसाठी आवाहन

EAGLE FOUNDATION
Reg No.San/000008/2020

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ईगल फाऊंडेशनच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय गरुडझेप पुरस्काराचे शानदार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या निमित्ताने पुरस्कार प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. यामध्ये राष्ट्रीय स्तर, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय स्तरावरील पुरस्काराचा समावेश आहे. यामध्ये गरुडझेप पुरस्कार, आदर्श माता, आदर्श पिता, आदर्श माता-पिता आदी पुरस्कार देण्यात येणार आहेत. महिला, वैद्यकीय, शैक्षणिक, सरपंच, राजकीय, प्रशासकीय, उद्योग, युवा, शेती, पत्रकारिता, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील व्यक्ती अथवा संस्थांना यामध्ये सहभाग घेता येईल.

दि.20 ऑक्टोबर 2025 पर्यंत प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुरस्कार माहिती पीडीएफ स्वरुपात ही पाठवू शकता. पुरस्कार नामांकन फॉर्म हवा असल्यास 9422420611 या व्हॉट्सअँप नंबरवर आपले नाव, पत्ता, हुद्दा कळवावा. अधिक माहितीसाठी याच फोनवर (सायंकाळी सहा ते सात ) फोन करु शकता. त्यासाठी फाउंडेशनचे प्रमुख पदाधिकारी श्री. सागर पाटील, शेखर सुर्यवंशी, प्रतापराव शिंदे (सांगली), शिरीष कुलकर्णी (पुणे ),प्रशांत लाड (रायगड),सचीन बैरागी, डॉ. सुनिल भावसार (नाशिक), प्रा. डॉ. महेश मोटे (धाराशिव), बापुसाहेब कांबळे, श्री. बाबासाहेब राशिनकर (गुहागर), अण्णासाहेब कोळी (सातारा), श्री. राजेश जोष्टे (चिपळूण), बापुसाहेब हुंबरे, बालासाहेब फड (बीड), अनिल उपाध्ये,प्रा. सर्जेराव राऊत, आनंदा जाधव (कोल्हापूर), सौ. संगिता शिंदे (सातारा), राजेंद्र गोसावी व प्रा. डॉ. प्रकाश माळी(ठाणे), अशोकराव शिंदे, प्रकाश वंजोळे, सौ. शालन कोळेकर (खंडाळा), श्री. दिपक पोतदार (जयसिंगपूर) सुनिल पवार (रत्नागिरी), दिलीप शेडगे (मुंबई), विजय जगताप व भास्कर सदावर्ते (पुणे), प्रा. डॉ. बापुसाहेब कांबळे (मुंबई), प्रा. रावसाहेब राशिनकर, संजय नवले, हरिभाऊ मंडलिक (अहिल्यानगर), श्री. दिनेश कांबळे, श्री. संजय गायकवाड (रायगड ), मनोज राऊत,विरभद्र पोतदार (सोलापूर), यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ठाणे जिल्हा परिषद व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद अभियंता संघटना, शाखा ठाणे आयोजित

# ‘अभियंता दिन’ व आदर्श अभियंता पुरस्कार वितरण समारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंतीनिमित्त “अभियंता दिन” व “आदर्श अभियंता पुरस्कार वितरण समारंभ” जिल्हा परिषद ठाणे व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद अभियंता संघटना, शाखा ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज, दि. १५ सप्टेंबर, २०२५ रोजी समिती सभागृह, बी. जे. हायस्कुल, टेंभी नाका, ठाणे (प.) येथे आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात “अभियंत्यांनी आपले ज्ञान सतत अद्ययावत ठेवले पाहिजे. अभ्यासपूर्वक व तांत्रिक कौशल्य आत्मसात करून कामकाज करणे हीच खरी प्रगती आहे. नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारल्यास ग्रामविकास आणि लोककल्याणाचे उद्दिष्ट साध्य होईल. जिल्हा परिषदेतील अभियंते ही विकासयात्रेतील प्रमुख ताकद असून त्यांचे योगदान अतुलनीय आहे.” असे मार्गदर्शन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, “जिल्हा परिषदेतील अभियंत्यांनी प्रत्यक्ष कामात येणाऱ्या अडचणींचा गांभीर्याने विचार करून त्यावर उपाय शोधणे आवश्यक आहे. कामकाज अधिक सुलभ व परिणामकारक होण्यासाठी समन्वय, नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरतो. या माध्यमातून समाजहिताचे प्रकल्प अधिक प्रभावीपणे राबवता येतील.” कार्यकारी अभियंता, बांधकाम इंजि. पद्माकर लहाने यांनी उपस्थित सर्व अभियंत्यांना विकास कामे तांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण करण्यात अग्रेसर रहावे याबाबत मार्गदर्शन केले.



जिल्हा परिषद अभियंता संघटना महाराष्ट्र (राज्यस्तर)शाखा ठाणेचे सचिव इंजि.मंगेश मसुरकर यांनी जिल्हा परिषद अभियंत्याच्या वतीने अभियंता दिनाच्या निमित्ताने नागरिकांना दर्जेदार व टिकाऊ कामे करून अभियंत्याच्या प्रती विश्वास निर्माण करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांचे आगमन, दीपप्रज्वलन व भारतरत्न सर विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेचे पूजन याने झाली.

**आदर्श अभियंता पुरस्कार प्राप्त अभियंते**

1.इं. अनिल जिवनराव दिवाण, शाखा अभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, शहापूर – आदिवासी भागात उल्लेखनीय सेवा.

2. इं. मनिषकुमार बागलराव हेर्लेकर, कनिष्ठ अभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, कल्याण – प्रधानमंत्री ग्राम सडक योजना विभागात विशेष कार्य.

3. इं. कैलास पंडितराव खलाणे, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, ठाणे – पाणीटंचाई निवारण कामात कौशल्यपूर्ण योगदान.

4. इं. विजय भिमराव सुलताने, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, जि.प. बांधकाम उपविभाग, भिवंडी – अभियंता तसेच रंगभूमीवरील कलावंत म्हणून उल्लेखनीय कार्य.

सेवानिवृत्त अभियंते यांचा देखील या समारंभात सत्कार करण्यात आला. यात इं. विलास चौधरी, इं. संतोष विशे, काशिनाथ भोईर, अनिल वाणी, विजय खानविलकर, प्रकाश सांबरे, तुकाराम जंगम, किशोर कुंभारे, युवराज निपुर्ते व शेख मोहम्मद शरिफ यांचा समावेश होता.

तसेच पदोन्नती मिळालेल्या अभियंत्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.• उप अभियंता पदावर पदोन्नती : इं. राजेंद्र नाळे, इं. विजय विसावले, इं. श्रीम. विजया पांढरे, इं. मनोज क्षिरसागर, इं. केतन चौधरी.

• कनिष्ठ अभियंता (बांधकाम) पदावर पदोन्नती : इं. वसंत मोरे, इं. श्रीम. भावना बेलदार, इं. किरण गोतारणे, इं. श्रीम. माधुरी दांडकर, इं. गौरव शिंदे, इं. अमेय पाटील, इं. विजय सुलताने, इं. वसंतकुमार निरगुडे, इं. प्रशांत पवार. या प्रसंगी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, कार्यकारी अभियंता बांधकाम पद्माकर लहाने, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रकाश सासे, कार्यकारी अभियंता सर्व शिक्षा अभियान युवराज कदम यांसह जिल्हा परिषदेतील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला.

# उल्हासनगर : राष्ट्रीय लोक अदालतीत पाचशेतीस खटले दाखल करून सुमारे अठरा लाखांहुन अधिक दंड वसुली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये तडजोडीसाठी उल्हासनगर वाहतूक शाखेने वाहतुकीचे नियम मोडणा-या अशा सुमारे५३०केसेस दाखल केल्या असून या दंडापोठी जवळपास१८लक्ष१७हजार५००रुपये इतका भरणा शासनाकडे केला आहे, त्यामुळे वाहतूक शाखेच्या वरीष्ठ अधिकारी, कर्मचारी व वार्डन यांचे कौतुक होत आहे.

कल्याण मुरबाड, कल्याण कर्जत, असे महत्त्वाचे महामार्ग उल्हासनगर शहरातून जातात, यामुळे शहाड उड्डाणपूल, बिर्लागेट, सेंच्युरी,खेमाणी, सेंट्रल हाॅस्पिटल,संत्सग चौक, आदी ठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी दिसून येते. याला रस्त्यावरील खड्डे, अतिक्रमण, कुठेही पार्किंग, वाहणांची वाढलेली भरमसाट संख्या, अपुरे व नादुरुस्त रस्ते, रस्त्यावर वारंवार बंद पडणारी अवजड वाहने, वाहतुकीचे मोडणारे नियम, आणि या सर्वावर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमणूक केलेले अपुरे कर्मचारी,या सर्वाचा परिणाम म्हणजे वाहतूक कोंडी?सध्या उल्हासनगर शहर वाहतूक शाखेत३३पोलीस३३वार्डन कार्यरत आहेत. हे दररोज २५०च्या आसपास केसेस करतात. यामध्ये रोड पार्किंग, हेल्मेट, सीटबेल्ट, विदाऊट लायन्स, मोबाईल टाॅकिंग इत्यादींचा समावेश आहे.

तेरा संप्टेबर रोजी राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली होती, काही विवाद, वाद, अडचणी समझोता, तडजोड करुन तो मिटवणे हा उद्देश या लोक अदालत चा असतो, जमीनीचे वाद, किंवा काही गंभीर गुन्हे सोडून इतर केसेसमध्ये तडजोड केली जाते, यामध्ये मिटवल्या जाणा-या तक्रारी, केसेस यांना कोठेही अपील करता येत नाही. यानुसार उल्हासनगर वाहतूक शाखेने५३०केसेस दाखल करून जवळपास१८लक्ष१७हजार५००रुपये इतका दंड शासन भरणा केला.ही कामगिरी वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली

उल्हासनगर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरसाट, पोहवा मोगरे, पोना नाना आव्हाड, पोना भारत खांडेकर, आणि वार्डन राहुल ससाने यांनी पार पाडली. त्यामुळे सध्या उल्हासनगर वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचां-याचे कौतुक होत आहे.



# टिटवाळ्यात विद्यार्थ्यांची मोफत रक्तगट तपासणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टिटवाळा येथील विद्यामंदिर शाळेतील सुमारे १८०० मुलांचे मोफत रक्तगट तपासणी शिबीर संपन्न झाले. रेड स्वस्तिक सोसायटी व स्पर्श फॉउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यामंदिर शाळेतील मुलांचे रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते एकाच दिवसात १८०० मुलांचे रक्तगट तपासणी करून देणे फार आव्हानात्मक होते. त्यानुसार सकाळी ८ वाजल्यापासून 25 ते 30 लॅब टेक्निशियन, डॉक्टर, शिक्षक, शाळेतील कर्मचारी व स्वयंसेवकाचे अथक परिश्रम, शिस्तबद्ध नियोजन व टीम वर्क मुळे विहित वेळेत खेळीमेळीच्या वातावरणात रक्तगट तपासणी शिबीर संपन्न झाले. या शिबिरात शाळेतील शिक्षक, कर्मचारी व उपस्थित लॅब टेक्निशियन यांना डॉ. स्वामी यांनी हार्ट अ‍ॅटक आल्यावर प्रथमोचार सीपीआर कसे करावे याबाबतचे प्रशिक्षण दिले. या शिबीरास रेड स्वस्तिक सोसायटी, स्पर्श फॉउंडेशन, ग्रामीण रुग्णालय गोवेली, देवी महालक्ष्मी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट टिटवाळा यांचे सहकार्य लाभले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विद्यामंदिर शाळेचे मुख्याध्यापक दिनेश भामरे, मारुती शिंगोळे, शिक्षक व कर्मचारी वृंद, उप जिल्हा रुग्णालय बदलापूरचे राजकुमार चव्हाण, गंधर्व गुरुकुलच्या संचालिका वैदेही नांदगावकर, शुभम शिर्के लॅब टेक्निशियन, ग्रामीण रुग्णालय गोवेलीचे डॉ अर्चना चव्हाण, देवी महालक्ष्मी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट टिटवाळाच्या पूजा मंढारे, तन्वी फाटक, स्पर्श फॉउंडेशनचे अध्यक्ष डॉ पुष्पराज स्वामी, दीपिका कांबळे, रेड स्वस्तिक सोसायटीचे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ प्रमोद नांदगावकर, रवि देसाई, कमलेश बोनावटे, मुकुंद नावकर यांनी परिश्रम घेतले.

# रंजना घोलप यांच्याकडून वृद्धांसाठी किराणा व चादरींचे वाटप

## समाजासाठी प्रेरणा ठरले मातोश्रीचे पुण्यस्मरण - वृद्धांसाठी सेवा कार्य



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : पांगरी माथा, बल्लाळवाडी (ता. जुन्नर) येथील शिवनेर प्रतिष्ठान, ऐरोली संचलित राजाराम पाटील वृद्धाश्रमात रविवार दि. १४ सप्टेंबर रोजी एका मनमोहक आणि प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. रोहोकडी (ता. जुन्नर) येथील रंजना अविनाश घोलप यांनी त्यांच्या मातोश्री कै. भीमाबाई भाऊसाहेब आरोटे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिकांसाठी शिधा (किराणा) आणि उबदार चादरींचे वाटप करून मायेची ऊब दिली.

या उपक्रमाबाबत माहिती देताना आश्रमाच्या व्यवस्थापिका मनीषा खिल्लारी म्हणाल्या की, “जेष्ठ नागरिकांसाठी अशा मदतीची खूप गरज असते. रंजना घोलप यांच्या योगदानामुळे अनेक वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान पाहायला मिळाले.” त्यांनी याप्रसंगी आश्रमातील सर्व रहिवाशांचे आणि सेवक वर्गाचे आभार मानले.

शिधा म्हणून वितरित करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये साखर, तांदूळ, गहू, रवा, पोहे, चहा पावडर, तेल यांसह आवश्यक खाद्यसामग्रीचा समावेश होता. त्यासोबतच १२ उबदार चादरी जेष्ठ नागरिकांना प्रदान करण्यात आल्या. थंडीच्या दिवसांत ही मदत त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी उपयुक्त ठरणार आहे. चादरी मिळाल्यानंतर अनेक वृद्धांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची झळाळी स्पष्टपणे दिसून आली.

रंजना घोलप यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, “आपण समाजाचे काही देणे लागतो ही भावना मनात ठेवून हा उपक्रम राबविला. आईच्या स्मरणार्थ काहीतरी समाजासाठी करावे, या हेतूने आम्ही हे कार्य हाती घेतले. अशा उपक्रमातून जेष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर हसू फुलते, हीच खरी श्रद्धांजली आहे.”

कार्यक्रमास मारुती राजाराम पाटील, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र भोर, अनुदानित आश्रमशाळा पतसंस्था नारायणगावचे खजिनदार अविनाश घोलप, आश्रमातील सेवक वर्ग तसेच जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजहितासाठी अशा सेवा कार्यांचा विस्तार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

या प्रसंगी आश्रमातील जेष्ठ नागरिकांनी रंजना घोलप आणि त्यांच्या कुटुंबाचे आभार मानले. समाजातील प्रत्येकाने अशा उपक्रमांत सहभागी होऊन जेष्ठांचा आधार बनावे, अशी सर्व उपस्थितांनी मनापासून भावना व्यक्त केली.

# ह्युंदाई कंपनीने राज्यात अधिकाधिक गुंतवणूक करीत रोजगार निर्मिती वाढवावी

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : वाहन उद्योगात ह्युंदाई कंपनीचे मोठे नाव आहे. कंपनीने राज्यातही गुंतवणूक केली आहे. पुणे येथील प्रकल्पातून वाहन उत्पादनात वाढ होणार आहे. ह्युंदाई कंपनीने राज्यात वाहन उद्योगात अधिकाधिक गुंतवणुक करीत रोजगार निर्मितीमध्ये वाढ करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी ह्युंदाई कंपनीच्या शिष्टमंडळासोबत आयोजित बैठकीत केले.

ह्युंदाई कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक उन्सू किम यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची भेट घेतली. बैठकीस मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, उद्योग सचिव डॉ. पी. अनबलगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, कंपनीचे कार्यकारी संचालक जिओन्जीक ली, उपाध्यक्ष (वित्त) सारावनन टी, सहायक उपाध्यक्ष पुनीत आनंद, कार्तिक एल, वरिष्ठ व्यवस्थापक विनोद बनसोड आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कंपनी राज्यात सामाजिक उत्तरदायित्वअंतर्गत विविध कामांसाठी ५६ कोटी रुपयांचा निधी देत आहे. ही बाब स्तुत्य असून या निधीतून राज्यात सुरू असलेली कामे पथदर्शी ठरतील. या निधीतून कंपनीने पर्यावरण संवर्धनासाठी काम करीत रस्ता सुरक्षा, चालक प्रशिक्षण आदींमध्ये काम करावे. राज्यात उद्योगस्नेही वातावरण तयार करून उद्योगांना सहकार्य करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

बैठकीत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सादरीकरण करीत कंपनीच्या गुंतवणुकीसंदर्भातील माहिती दिली. पुणे येथील प्रकल्पाच्या कामाची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील वृक्षारोपण मोहीम, रस्ता सुरक्षा उपक्रम आदींचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

# पेण पोलिसांचे वृक्षारोपण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता /पेण : पेण पोलीस ठाणे हद्दीत पेण पोलीस लाईन येथे पेण उपविभागीय पोलीस अधिकारी नालकुल यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. यावेळी पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल व पोलीस ठाणे अधिकारी व पोलिस अंमलदार आदिंच्या उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला यावेळी वेगवेगळी झाडे परिसरात लावण्यात आली.

# लहरी पाऊस आणि हवामान बदलाचा फटका भात शेतीला बसण्याची भीती - सी.आर.म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : कधी ऊन,कधी मुसळधार पाऊस,यासर्व प्रकारच्या लहरी हवामानाचा मोठा फटका यावेळी खारेपाट विभागातील भात शेतीला बसणार असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याची माहिती पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी. आर. म्हात्रे यांनी दिली. कारण पूर्वी ७ जून पावसाळ्यातील पहिला दिवस ,वगैरे दिवस संपले.आत्ता तर मे महिन्यापासून हा पाऊस बरसतो आहे,यामुळे धड पेरणी झाली नाही ,शेतकरी राजाने जीवाचे रान करून विविध उपाय करून शेती लावणी केली,तिला हिरवे शालू नेसवले.

या वेळी तर श्रावण महिन्यातील इंद्रधनुचे दर्शनच घडले नाही. या सततच्या पावसाने तर हातात आलेले पीक वाया तर जाणार नाही ना? ही भीती सतावत आहे. या ढगाळ वातावरणात पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे,पानावर करपा(leaf blast), पसरून पिके काळी पडत आहेत, शेठया व पानावर डाग रोग( ब्राऊन स्पॉट),भातशेती पाण्याखाली जास्त दिवस राहिल्याने .मूळकूज, व दंड कुज होऊन भात विकास खुंटतो.याशिवाय किडा प्रादुर्भाव पांढरी माशी,पान भक्षक कीड,तुडतुडे यांचा प्रादुर्भाव करण्यास ही महागडी औषधे वापरावी लागतात ,खते ,बियाणे,मजुरीवर अगोदरच खर्च होतो आणि हा खर्च याचा परिणाम उत्पादन खर्च यात ताळमेळ बसत नाही.पर्यायाने शेती करण्यासाठी बळीराजाची मानसिकता यावर साहजिकच परिणाम होतो. इंद्रायणी, आंबेमोहर, कोलम, झी री, कर्जत ३४, कर्जत ६४, अशा पारंपरिक पिकांना थेट फटका बसत आहे.हवामानात होणारा बदल याविषयी कृषी खात्याकडून मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.जलव्यवस्थापन याचा शास्त्रीय प्रचार होणे हितावह,पीक विमा याची काटेकोर अंमलबजावणी होऊन,शेतकऱ्यांना योग्यवेळी सहाय्य मिळाले पाहिजे.जेथे जेथे आपत्ती झाली असेल तेथे लगेच पंचनामे झाले पाहिजेत. नाहीतर शेतीवर होणारा प्रचंड खर्च,थोडके पिक या तुटीच्या अंदपत्रकात शेतकरी हैराण होईल. इंद्रायणीच्या सुगंधासकट बळीराजाचे स्वप्न वाहून जाण्याचा धोका आहे.शेती वाचली तर शेतकरी वाचेल आणि शेतकरी वाचला तर समाज वाचेल, कारण शेती हा विकासाचा कणा आहे असेही सी.आर.म्हात्रे यांनी सांगितले.

# पडघ्यात पाणीपुरवठ्यास अडथळा आणणाऱ्या अनोळखी व्यक्तीवर कारवाईची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठ्यास अडथळा आणणाऱ्या अनोळखी व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायतीने लेखी तक्रारीव्दारे पडघा पोलीस ठाण्याकडे केली आहे.

बसस्थानक परिसरात पडघा ग्रामपंचायतीचा गावात पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचा वॉल असुन या वॉल पाईपामध्ये अनेक दिवसांपासून अज्ञात व्यक्तींकडून दगडी, खडी, रेती, कचरा टाकण्याचे प्रकार सुरू असल्याने पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना बस स्थानक परिसरात पाणी पुरवठा करण्यास अडथळा येत होता. ती सर्व घाण कर्मचाऱ्यांनी काढुन त्या परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला होता मात्र शुक्रवारी पाणीपुरवठा कर्मचारी पाणी सोडण्यासाठी वॉलजवळ गेले असता त्यामध्ये कुणातरी अज्ञात व्यक्तीने शौच केल्याचे निदर्शनास आल्याने पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांनी पाणी सोडण्यास नकार दिला व ही बाब ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर ग्रामपंचायतीने पाणीपुरवठ्यास आडथळा आणणाऱ्या अज्ञाताविरोधात सरपंच रविंद्र विशे यांच्या सहीने लेखी तक्रार दाखल केली असुन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.त्यामुळे बस स्थानक परिसरातील वॉल पाईपामध्ये घाण करून नागरिकांना जाणुन बुजून पाण्यापासून वंचित ठेवणाऱ्या अज्ञाताविरोधात पोलीस कारवाई करतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डॉक्टरकडून फार्मासिस्टची ७० लाखांची फसवणूक

## खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : एका डॉक्टर दाम्पत्याने रुग्णालयात मेडिकल स्टोअर देण्याचे आमिष दाखवून डॉक्टर आणि फार्मासिस्टची ७० लाख रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी कल्याणच्या खडकपाडा पोलिसांनी डॉक्टर दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मे २०२४ मध्ये, ठाणे येथील हिरानंदानी इस्टेटमध्ये राहणारे डॉ. प्रसाद साळी आणि त्यांची पत्नी वैशाली प्रसाद साळी यांनी कल्याण येथील डॉ. राहुल दुबे आणि फार्मासिस्ट प्रज्ञा सौरभ कांबळे यांच्याकडून ७० लाख रुपये घेतले आणि आयकॉन बिल्डिंगमध्ये पन्नास खाटांचे नवीन रुग्णालय बांधण्याचे आणि त्यात मेडिकल स्टोअर देण्याचे आश्वासन दिले. डॉ. प्रसाद यांनी ३ महिन्यांत रुग्णालय बांधण्याचे आश्वासन दिले होते, परंतु एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटला तरी त्यांनी रुग्णालय सुरू केले नाही किंवा पैसे परत केले नाहीत. डॉ. राहुल यांच्या म्हणण्यानुसार, डॉक्टर दाम्पत्याला रुग्णालय उघडण्यासाठी मोठ्या रकमेची आवश्यकता होती, म्हणून त्यांनी मेडिकल स्टोअरच्या बहाण्याने मोठी रक्कम घेतली. या प्रकरणात, खडकपारा पोलिसांनी डॉ. प्रसाद साळी आणि त्यांची पत्नी वैशाली प्रसाद साळी यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# ई-पिक पाहणी सर्वर कोसळल्याने शेतकरी त्रस्त

## अधिकारी पडताहेत रोषाचे बळी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : ई-पिक पाहणी सर्वर कोसळल्याने ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी त्रस्त असुन महसूल अधीकाऱ्यांना शेतकऱ्याच्यां रोषाला सामोरे जावे लागत आहे.

शासनाच्या ई-पिक पाहणी प्रणालीस जमाबंदी आयुक्त पुणे यांना दिनाक २० /०९/२०२५ पर्यंत ई -पिक पाहणी करण्यास शेतकऱ्यांना मुदतवाढ दिली आहे परंतु ठाणे जिल्ह्यातील कल्याण, मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ, शहापुर या तालुक्यात प्रत्यक्षात ही प्रणाली कोलमडलेली दिसत आहे. कारण ई - पिक पाहणी चे अ‍ॅप मोबाईलवर चालत नाही ,सर्वर सतत अकार्यक्षम, “गोल गोल फिरते” अशी तक्रार शेतकरी वर्गातून सातत्याने येत असुन शेतकऱ्यांच्यात संताप व्यक्त होत आहे.परिणामी, शेतकरी शेतात जाऊन पिक पाहणी भरू शकत नाहीत, त्यामुळे तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार वर्गावर शेतकऱ्याकडून नाहक रोष व्यक्त केला जात आहे.शेतकरी म्हणतात, “आम्ही शेतात जाऊन मोबाईलवर पिक पाहणी भरायला जातो, पण सर्वर चालतच नाही. मग आम्ही स्थानिक तलाठ्यांना फोन करतो, ते मार्गदर्शन करतात परंतु सर्वरच बंद असेल तर तलाठी काय करणार?अशी चर्चा शेतकऱ्यांच्यात दबक्या आवाजात सुरू आहे तसेच वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांकडून तलाठ्यांवर दबाव टाकला जातो की शेतकऱ्यांना मदत करा. पण “आडातच नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार?” या म्हणीप्रमाणे तलाठी वर्ग अडचणीत सापडला असुन शेतकरी शासनाच्या योजनांपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील संपुर्ण तालुक्यात ठाणे, शहापुर, भिवंडी, मुरबाड, कल्याण या तालुक्यातील शेतकरी प्रतिनिधींनी मागणी केली आहे की ऑनलाईन प्रणाली अकार्यक्षम ठरते, तेव्हा तलाठी किंवा डिबीए नायब तहसीलदार यांच्या लॉगिनद्वारे ऑफलाइन पद्धतीने पिक पाहणी भरता यावी, अशी सुविधा शासनाने उपलब्ध करून द्यावी.ही केवळ तांत्रिक अडचण नाही, तर शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारी आहे. तरी शासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन, सर्व्हरची गुणवत्ता सुधारावी किंवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातुन जोर धरू लागली आहे.

# सरस्वती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीयस्तरावर कराटे स्पर्धेत धवल कामगिरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान असोसिएशन इंडिया आयोजित राष्ट्रीय स्तरीय कराटे स्पर्धा प्रियदर्शिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मुलुंड येथे पार पडली त्या मध्ये सरस्वती विद्यालयातल्या विद्यार्थिनींना बाजी मारली. यात प्रामुख्याने वासिंदच्या कु.लावण्या सदाशिव सातपुते इयत्ता ११ वी हिने १६ वर्ष वयोगट मध्ये सुवर्ण पदक तर हर्ष गायकर इयत्ता १० वी हिने १५ वर्ष वयोगटातील रौप्य पदक तसेच मयुरी ठाकरे इयत्ता ९ वी, केतकी साबळे इयत्ता ९ वी, यांनी १५ वर्ष वयोगटातील कांस्य पदक, तर आर्या शेलार इयत्ता ८ वी हिने १४ वर्ष वयोगट मध्ये कास्य पदक मिळवून शाळेचे नाव लौकिक मोठे केले आहे. त्यांचे व क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) दौलत चव्हाण सर क्रीडा प्रमुख , सुनील ठाकरे सर यांचे पर्यवेक्षक धनगर सर , भोईर सर, उप प्राचार्य सापळे सर , प्राचार्या श्रीमती कांबळे मॅडम यांनी अभिनंदन केले तसेच रविंद्र शेलार साहेब, सेक्रेटरी विद्या विकास मंडळ, वासिंद, विठ्ठल सातवी साहेब, चेअरमन विद्या विकास मंडळ वासिंद, सर्व संचालक यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून कौतुक केले व सर्वांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

कु.लावण्या सदाशिव सातपुते
इयत्ता ११ वी : १६ वर्ष वयोगट :
सुवर्ण पदक
हर्ष गायकर इयत्ता १० वी :
१५ वर्ष वयोगट : रौप्य पदक
मयुरी ठाकरे इयत्ता ९ वी :
केतकी साबळे इयत्ता ९ वी :
१५ वर्ष वयोगट : कांस्य पदक
आर्या शेलार इयत्ता ८ वी : १४ वर्ष
वयोगट : कांस्य पदक

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
Follow, Unfollow, & Create Them
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# खान्देश कुंभार समाजातर्फे विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खान्देश कुंभार समाजाच्या वतीने स्नेह मेळावा व विद्यार्थी गुणगौरव समारंभ रविवारी कल्याण पश्चिमेतील सिद्धिविनायक हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश संस्थापक अध्यक्ष सतिष दरेकर, प्रदेश अध्यक्ष रमाकांत क्षिरसागर, धुळे जिल्हा अध्यक्ष सुरेश बहाळकर, महिला प्रदेश अध्यक्षा रसिका खेडकर, यशवंत जगदाळे, डॉ. सुरेश काळे, नंदु वाघ, संस्थेचे अध्यक्ष रमेश मोरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष देवानंद चव्हाण आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमात समाजातील गुणवंत विद्यार्थी, उद्योगरत्न पुरस्कार, सेवापूर्ती पुरस्कार,व पदोन्नती मिळणाऱ्या समाज बांधवांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुणे सतिश दरेकर यांनी समाज संघटित झाल्यास येणाऱ्या पिढीस कसा उपयुक्त होईल व संघटित समाज आपल्या मागण्या सरकार पर्यंत नेईल. महिला सक्षमीकरण, जनगणना करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास समाजातील सर्व बंधू भागिनी व पदाधिकारी यांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच स्वरगंध मंडळ तर्फे सुमधूर भक्तिगीते सादर केली गेली. या कार्यक्रमात कल्याण संस्थेचे लक्ष्मण पगारे, अनिरुद्ध चव्हाण, एकनाथ सोनवणे, नरेंद्र मोरे या सदस्यांना प्रदेश कार्यकारिणीत स्थान देऊन नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024